दै.बीड
www.beedsuperfast.com
# सुपरफास्ट
• संपादक : अतुल शंकरराव जाधव •
• beedsuperfastgmail.com •

# मान्सून केरळमध्ये २६ तारखेला होणार दाखल

**पुणे । प्रतिनिधी**



देशभरातील शेतकरी, हवामानतज्ज्ञ आणि नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जाणाऱ्या मान्सूनच्या आगमनाची प्रक्रिया यंदा लवकर सुरू होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागाने शुक्रवारी दिलेल्या अंदाजानुसार, केरळमध्ये २६ मे रोजी मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तवली आहे. यामुळे मान्सूनच्या प्रतिक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही दिलासादायक बातमी आहे. मे महिना लागला की, देशातील शेतकऱ्यांना मान्सूनची प्रतिक्षा असते, ही प्रतिक्षा आता संपली असून, वेधशाळेने याची » पान २ वर

■ बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ ■ अंक १३१ ■ रविवार दि. १७ मे, २०२६ ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ पाने ४ ■ किंमत ४ रु.
■ BEED (Maharashtra) ■ Year-4 ■ Issue-131 ■ Sunday 17 May, 2026 ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ Pages 4 ■ Price 4

# मनोज जरांगे पाटील ३० मे पासून पुन्हा उपोषणाला बसणार; मराठा आरक्षणासाठी पुन्हा रणशिंग फुंकलं

**जालना । प्रतिनिधी**


मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा रणशिंग फुंकले आहे. ३० मे पासून मनोज जरांगे पाटील हे आंतरवाली सराटीत पुन्हा आमरण उपोषणाला बसणार आहेत. मराठा आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे बैठक बोलावली होते. यावेळी समर्थकांना संबोधित करताना त्यांनी ही घोषणा केली आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपण अडीच-तीन वर्षापासून लढत आहोत. समाजाच्या पदरात काय पडले? जून महिन्यात ऍडमिशन आहेत. ५८ लाख नोंदी निघाल्या आहेत. सरकार जळतंय, मराठा समाजाला मोठं होऊ द्यायचं नाही ही सरकारची भूमिका आहे. सत्तेशिवाय नाही तर मराठ्यांशिवाय शहाणपण चालत नाही. आपल्या समाजाचा एवढा द्वेष का? भाजपमधल्या मराठ्यांच्या लेकीबाळीला आरक्षण लागणार नाही का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

आपल्याकडे रुपया नाही, पैशावाले आपल्यात येत नाहीत. मी प्रामाणिक आहे. आपल्याला वारंवार लढावं लागणार आहे. मुंबई तुम्ही विचाराने जिवंत केली. मुंबईतील लोक आम्हाला पुन्हा येणार का? म्हणून विचारतात. आता आंदोलन असं करायचं की पुन्हा फडणवीसांना चारी दिशेला काही दिसले नाही पाहिजे. नुसते मराठेच दिसले पाहिजे. मी फडणवीसांना दोष देत नाही. तुम्ही हैदराबादचा ऋ्ठ काढला पण तुम्ही का रोखले? फडणवीस तुम्हाला मंत्री मराठ्यांनीच केलंय. अधिकारी प्रमाणपत्र देत नाहीत, त्याला फडणवीस साहेबच जबाबदार आहेत. फडणवीस साहेबांनी विधानसभेत एक भाषण केलं होतं. मंत्र्यांना किंमत नाही, मुख्यमंत्रीच सर्वेसर्वा आहेत. याचा अर्थ तुम्हीच प्रमाणपत्र रोखले आहे, असा आरोप देखील मनोज जरांगे पाटील यांनी केला. मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, फडणवीस साहेब, या गोरगरिबांची मने जिंका. तुमच्या ५० पिढ्या आल्या तरी मी मराठ्यांना धक्का लावू देणार नाही. फडणवीसांनी मराठवाड्यातील मराठ्यांना प्रमाणपत्रासाठी रोखू नये. आंदोलनाच्या तारखेच्या आता प्रमाणपत्र द्या. ५८ लाख नोंदी सापडल्या त्याचे सर्व प्रमाणपत्र द्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यावेळी अभियान घेऊन प्रमाणपत्र वाटले. तसेच फडणवीसांनी करावे. शिंदे साहेबांनी जसे अभियान घेतले तसे तुम्हीही घ्या, असे आवाहन देखील त्यांनी केले. सातारा संस्थानचा ऋ्ठ तुम्ही का काढला नाही. अखंड महाराष्ट्र आमचा आहे. आम्ही आठ महिने दम खाल्ला. मी आता वेळ देऊ शकत नाही. सातारा, कोल्हापूर, औंध संस्थानाचा GR काढून त्याची अंमलबजावणी करा. ओबीसींना कसा एका ऋ्ठ दिवसात काढला, असे देखील त्यांनी म्हटले.




# गेवराई बसस्थानकासमोर बेशिस्त पार्किंगचा कहर

## भर उन्हात वाहनांच्या लांबच लांब रांगा, नागरिक हैराण



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील बसस्थानक परिसरात गुरुवारी दुपारी पुन्हा एकदा भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली. बसस्थानकासमोर बेशिस्त आणि अवैध पार्किंगमुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. जवळपास ४२ अंश सेल्सिअस तापमानात वाहनचालक आणि प्रवाशांना उकाड्याचा प्रचंड त्रास सहन करत काही काळ रस्त्यातच अडकून पडावे लागले. नागरिकांच्या माहितीनुसार, बसस्थानकासमोर दुचाकी, चारचाकी तसेच प्रवासी वाहनांचे अनियमित पार्किंग वाढल्याने ही परिस्थिती निर्माण झाली. रस्त्यावर अस्ताव्यस्त उभ्या करण्यात आलेल्या वाहनांमुळे एसटी बसेसना बसस्थानकात प्रवेश करणे आणि बाहेर पडणे कठीण झाले होते. परिणामी काही काळ संपूर्ण परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली.वाहतूक कोंडीमुळे प्रवासी, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना भर उन्हात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अनेक वाहनचालक उकाड्यामुळे त्रस्त झाले होते. काही ठिकाणी वाहनांच्या धुरामुळे गुदमरल्यासारखे वातावरण » पान २ वर

# गायरान जमिनीच्या वादातून खून

**शिरुर का. तालुक्यातील घटना; मृतदेह ताब्यात घेण्यास नातेवाईकांचा नकार; गावात तणावाचे वातावरण**



**बीड । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील पाडळी येथे गायरान जमिनीच्या वादातून झालेल्या मारहाणीत गंभीर जखमी तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, मृताच्या नातेवाईकांनी गुन्हा दाखल होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाडळी येथील शंकर अश्रू बर्डे (वय ३६ वर्ष) यांना गायरान जमिनीच्या वादातून गावातील काही व्यक्तींनी बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे. या मारहाणीत त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. प्राथमिक उपचारासाठी त्यांना रायमोहा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी बीड येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात » पान २ वर

# कार अन् दुचाकीची धडक; दोन ठार

## मांजरसुंबा,पाटोदा महामार्गावरील घटना



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी नगर-अहमदपूर मार्गावरील लिंबागणेश येथे शुक्रवारी मध्यरात्री कार, दुचाकीचा भीषण अपघात घडून दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला. या राष्ट्रीय महामार्गावरील वाढते अपघात चिंता व्यक्त केली जात आहे.

बबन काशिनाथ लगास आणि ज्ञानदेव विष्णू लगास दोघे रा. चिखलबीड (ता. वडवणी) असे मयतांची नावे असल्याचे समजते. शुक्रवार (दि. १५) रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास विस्टा कार क्र. एमएच ०५ एएक्स ०३८८ आणि हिरो स्प्लेंडर दुचाकी क्र. एमएच ४४ एए ६२२६ यांच्यात समोरासमोर धडक होऊन लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालय परीसरात अपघात घडला, हा अपघात इतका भीषण होता की, दुचाकीवरील दोन्ही प्रवाशांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. धडकेनंतर दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत » पान २ वर



बीड : येथील शनि मंदिरात आज शनिवारी (दि.१६) शनि अमावास्याच्या निमित्ताने भाविक भक्तांनी मोठी गर्दी केली होती. यामुळे मंदिराचा परिसर भक्तांच्या गर्दीने फुलून गेल्याचा दिसून आला.

# माजी आ.संगीता ठोंबरेंना लोकायुक्तांची क्लिन चिट

**केज । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सहकारी सूतगिरणीने १४ कोटींची शासनाची फसवणूक केल्याच्या प्रकरणात लोकायुक्तांनी माजी आमदार संगीता ठोंबरे यांना क्लीन चिट दिली आहे. यामुळे सूतगिरणी प्रशासनाला दिलासा मिळाला आहे. माजी आ. संगीता ठोंबरे यांनी केज तालुक्यात सुत गिरणी उभारणीला सुरुवात करताच त्यांच्यावर अंबाजोगाई येथील सचिन चव्हाण यांनी सूतगिरणीने बनावट कागदपत्रे, बनावट ७/१२ उतारे, खोट्या बांधकाम परवान्याच्या आधारे शासनाची १४ कोटी रुपयांची फसवणूक केली असल्याचा आरोप केला आहे. या प्रक्रियेत समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगनमत केल्याचा दावाही लोकायुक्तांकडे केलेल्या तक्रारीत केला होता. मात्र याची पूर्ण चौकशी होऊन या प्रकरणी माजी आ. संगीता ठोंबरे यांना क्लीन चिट देण्यात आली आहे. यामुळे त्यांनी सत्याचा विजय झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.



# चेक बाऊन्स; शिक्षकास सहा महिन्यांची शिक्षा!

## ॲड.शशिकांत सावंत यांची दमदार बाजू ठरली निर्णायक

### कायद्याचे ज्ञान असूनही केला गुन्हा; न्यायालयाने सुनावली कठोर शिक्षा

**बीड । प्रतिनिधी**

अनादरीत धनादेश (चेक बाऊन्स) प्रकरणात बीड येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (द्वितीय) न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल देत आरोपी शिक्षकास सहा महिन्यांच्या कारावासाची तसेच दंडाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात फिर्यादीच्यावतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी अत्यंत भक्कम व प्रभावी युक्तिवाद करत न्यायालयासमोर सक्षम बाजू मांडल्याने निकाल फिर्यादीच्या बाजूने लागला. विशेष म्हणजे प्रकरणातील आरोपी हा व्यवसायाने शिक्षक असल्याने त्यास कायद्याचे पूर्ण ज्ञान असल्याचे न्यायालयासमोर अधोरेखित करण्यात आले. तरीदेखील त्याने कायद्याचे



उल्लंघन केल्याने त्याच्यावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी फिर्यादीच्यावतीने करण्यात आली होती. न्यायालयानेही आरोपी शिक्षक असल्यामुळे त्याच्याकडून अधिक जबाबदारी अपेक्षित असल्याचे नमूद करत जास्तीत जास्त शिक्षा आणि दंड सुनावला. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी बाबासाहेब मारुती » पान २ वर

### कायदेशीर युक्तिवाद महत्वाचा ठरला

या प्रकरणात फिर्यादीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि कायदेशीर मुद्द्यांवर आधारित युक्तिवाद केला. न्यायालयानेही त्यांच्या मांडणीची गंभीर दखल घेत आरोपीचा बचाव फेटाळून लावला. बीड जिल्ह्यात विविध फौजदारी व आर्थिक प्रकरणांमध्ये अचूक कायदेशीर मांडणी आणि प्रभावी युक्तिवादामुळे ॲड.शशिकांत सावंत यांची कारकीर्द सध्या विशेष चर्चेत असून, या निकालाने त्यांच्या यशस्वी वाटचालीत आणखी एक महत्त्वपूर्ण नोंद झाली आहे. या प्रकरणात त्यांना ॲड. विशाल विलासराव कदम, ॲड.अभिषेक बहिर, ॲड. माऊली डाके, ॲड. राजकुमार धरणे, ॲड. प्रदीप दराडे, ॲड. विजय डोके, ॲड. अमोल तिडके आणि ॲड. प्रतीक गव्हाणे यांनी सहकार्य केले.

# पोस्ट कार्यालयामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र काउंटर द्या

## बीड शहर बचाव मंचाची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर बचाव मंचाच्या शिष्टमंडळाने आज बीड मुख्य पोस्ट कार्यालयाचे पोस्टमास्टर यांची भेट घेऊन विविध जनहिताच्या मागण्यांचे निवेदन सादर केले. पोस्ट कार्यालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता, त्यांच्या सोयीसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.



खाजगी तसेच सहकारी बँकांमधील आर्थिक गैरव्यवहार आणि दिवाळखोरीच्या घटनांमुळे सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास पुन्हा एकदा शासकीय पोस्ट कार्यालयांकडे वाढताना दिसून येत आहे. पोस्टाच्या विविध बचत योजनांमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या वाढल्याने कार्यालयांमध्ये मोठी गर्दी होत असून, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असल्याची बाब मंचाच्या पाहणीत निदर्शनास आली.या पार्श्वभूमीवर बीड शहर बचाव मंचाने पोस्ट प्रशासनाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या -सर्व पोस्ट कार्यालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करावेत. महिला व महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठीही विशेष सुविधा उपलब्ध » पान २ वर